**इतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३७२ /२०१७**

**निशाणी क्र.११४.**

**अर्जदारतर्फे साक्षीदार क्रमांक.** ४

देवाशपथ खरे सांगतो की,

नावः–रविंद्र भाऊराव वाघे.

वयः– ५० वर्षे, व्यवसायः–नोकरी.

राः– इंदापूर ,ता.इंदापूर, जि.पुणे.

**अर्जदारतर्फे साक्षीदाराचा सरतपास वकील श्री. ए जी शहा यांच्यामार्फत सुरु :–**

मी एप्रिल २०२५ पासून इंदापूर येथे स्टेट बँक ऑफ इंडिया येथे मुख्य प्रबंधक म्हणून कार्यरत आहे. आज साक्ष देण्याकरीता मला साक्षसमन्स प्राप्त झालेले आहे. त्याप्रमाणे मी आज माझ्यासोबत आमच्या शाखेतील कलम तुकाराम देवकर व संतोष तुकाराम देवकर यांच्या संयुक्त बचत खात्याचा सन २०१५ पासूनचा खातेउतारा आणलेला आहे. तसेच, मी भारतीय साक्ष पुरावा अधिनिमय कलम ६५–ब नुसारसचे प्रमाणपत्र देखील खाते उताऱ्यासोबत दाखल केले आहे. आता मला सदर खाते उतारा व प्रमाणपत्र दाखविण्यात आले. त्यावर बँकेचा शिक्का आहे. प्रमाणपत्रावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ११५** देण्यात येते. सदर खातेउता–यातील "सेमटेक्स बाय सॅलरी'' ही नोंद कारखान्याच्या बीलाची आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास गैरअर्जदारतर्फे वकिल श्री एन जी शहा–**

गैरअर्जदार व विधीज्ञ वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब, उलट तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

दिनांकः १५/१०/२०२५ (प्र.चं.बारटक्के)

ठिकाण – इंदापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.

**इतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३७२ /२०१७**

**निशाणी क्र.११६.**

**अर्जदारतर्फे साक्षीदार क्रमांक.** ५

देवाशपथ खरे सांगतो की,

नावः–गणेश बाळासाहेब खटके.

वयः– ३९ वर्षे, व्यवसायः–नोकरी.

राः– इंदापूर ,ता.इंदापूर, जि.पुणे.

**अर्जदारतर्फे साक्षीदाराचा सरतपास वकील श्री. ए जी शहा यांच्यामार्फत सुरु :–**

मी सप्टेबर २०२२ पासून इंदापूर येथे पी.डी.सी.सी. बँक येथे विकास अधिकारी म्हणून कार्यरत आहे. आज साक्ष देण्याकरीता मला साक्षसमन्स प्राप्त झालेले आहे. त्याप्रमाणे मी आज माझ्यासोबत आमच्या शाखेतील कलम तुकाराम देवकर व संतोष तुकाराम देवकर यांच्या संयुक्त बचत खात्याचा सन २०१७ पासूनचा खातेउतारा आणलेला आहे. तसेच, मी भारतीय साक्ष पुरावा अधिनिमय कलम ६५–ब नुसारचे प्रमाणपत्र देखील खाते उताऱ्यासोबत दाखल केले आहे. आता मला सदर खाते उतारा व प्रमाणपत्र दाखविण्यात आले. त्यावर बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ११७** देण्यात येते. आता मला भारत तुकाराम देवकर यांचा खाते उतारा व प्रमाणपत्र दाखविण्यात आले. त्यावर बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ११८** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास गैरअर्जदारतर्फे वकिल श्री एन जी शहा–**

गैरअर्जदार व विधीज्ञ वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब, उलट तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

दिनांकः १५/१०/२०२५ (प्र.चं.बारटक्के)

ठिकाण – इंदापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.